# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dteaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/ ८६६८

दिनांक :- 4 DEC 2018

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय /अनुदानित/विना-अनुदानित/अभियांत्रिकी/औषधनिर्माण शास्त्र/व्यवस्थापन शास्त्र/

वास्तुशास्त्र, पदवी, पदविका, पद्व्युत्तर पदवी संस्था

**औरंगाबाद विभाग**

विषय : **राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील विद्यार्थी, शिक्षक व संबंधितांकरीता संस्थांमध्ये ऑनलाईन तक्रार निवारण कार्यप्रणाली उपलब्ध करुन देणेबाबत.**

संदर्भ : ०१ अखिल भारतीय तंत्र तंत्रशिक्षण परिषदेचे परिपत्रक क्र.१-१०१/DPG/AICTE/Regulation-2017 Dt. 20th Feb 2017

०२ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/परिपत्रक-४/२०१८/१४६८, दिनांक १२/११/२०१८

भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या निर्देशानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भाधीन परिपत्रकान्वये परिषदेच्या मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी विद्यार्थी, शिक्षक व संबंधितांकरीता संस्थामध्ये ऑनलाईन तक्रार निवारण कार्यप्रणाली उपलब्ध करुन देणे बाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीताच्या ॲप्रुवल प्रोसेस हॅन्डबुक मध्ये APPENDIX 6 (27)(Annexure12) मध्येही याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

तरी आपणास सुचित करण्यांत येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निर्देशानुसार संस्थेच्या संकेतस्थळावर विद्यार्थी, शिक्षक व संबंधितांकरीता ऑनलाईन तक्रार निवारण कार्यप्रणाली उपलब्ध करुन देणेबाबत त्वरीत कार्यवाही करावी. सदर बाब संबंधितांना अवगत होण्याकरीता संस्थेच्या प्रसिध्दीफलकावर/दर्शनीय ठिकाणी कायमस्वरुपी प्रसिध्द करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास्तव.